IIP: WJHSS
IIP World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# वंचितांचा इतिहास आणि सामाजिक परिवर्तन

**प्रा. सविता शंकर वीर**

राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे,
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, लांडेवाडी,भोसरी, पुणे -३९

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*वंचितांचा इतिहास*
*सामाजिक परिवर्तन*

**ABSTRACT**

अलीकडच्या काळात इतिहास विषयक एक नवीन दृष्टिकोन उदयसेवू लागला भारतात इतिहास लेखन विविध स्तरावर झाले. राष्ट्रवादी विचार प्रवाहने झालेल्या इतिहास लेखनात भारताचे अंतरंग दिसत नाहीत. भारतीय समाजातील विविध जाती वर्ग जातीविरोधी आंदोलने सामाजिक धार्मिक चळवळी ब्राह्मण इतरांची चळवळ याकडे इतिहासकाराने विशेष लक्ष दिले नाही. बहुतेक लेखन पुरुषप्रधानतेतून झाले . इतिहास लेखनात महात्मा फुले डॉक्टर आंबेडकर नामशूद्र चळवळ मातुआ पंथ स्वाभिमानी चळवळ हे विचार आलेच नाही. स्वातंत्र्योत्तर काळात सण १९५०ते ६०या काळात भारतीय विचार परंपरेवर डाव्यांचा प्रभाव पडला. मार्क्सवादी विचाराने इतिहासाचे पुनर्लेखन करण्याचे प्रयत्न झाले. त्यामध्ये श्रीपाद अमृत डांगे, रजनी पाम दत्त,ए.आर. देसाई, डी.डी.औ कोसंबी यांचा समावेश होईल. राजकीय सुधारणा की सामाजिक सुधारणा या वादात राजकीय विषयाला महत्त्व देण्यात आले. गेल ऑमव्हेट यांनी जात प्रमुख म्हणून लिखाण केले. स्त्रीवादी लिखाणाला याच काळात मान्यता मिळाली. या विविध प्रवाह मधून १९८२ पासून वंचितांच्या अभ्यासात सुरुवात झाली.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 4%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Veer, S. S. (2025). *वंचितांचा इतिहास आणि सामाजिक परिवर्तन*. IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), **608–612**.

**प्रस्तावना:-**

अलीकडच्या काळात इतिहास विषयक एक नवीन दृष्टिकोन उदयसेवू लागला भारतात इतिहास लेखन विविध स्तरावर झाले. राष्ट्रवादी विचार प्रवाहने झालेल्या इतिहास लेखनात भारताचे अंतरंग दिसत नाहीत. भारतीय समाजातील विविध जाती वर्ग जातीविरोधी आंदोलने सामाजिक धार्मिक चळवळी ब्राह्मण इतरांची चळवळ याकडे इतिहासकाराने विशेष लक्ष दिले नाही. बहुतेक लेखन पुरुषप्रधानतेतून झाले . इतिहास लेखनात महात्मा फुले डॉक्टर आंबेडकर नामशूद्र चळवळ मातुआ पंथ स्वाभिमानी चळवळ हे विचार आलेच नाही. स्वातंत्र्योत्तर काळात सण १९५०ते ६०या काळात भारतीय विचार परंपरेवर डाव्यांचा प्रभाव पडला. मार्क्सवादी विचाराने इतिहासाचे पुनर्लेखन करण्याचे प्रयत्न झाले. त्यामध्ये श्रीपाद अमृत डांगे, रजनी पाम दत्त,ए.आर. देसाई, डी.डी.औ कोसंबी यांचा समावेश होईल. राजकीय सुधारणा की सामाजिक सुधारणा या वादात राजकीय विषयाला महत्त्व देण्यात आले. गेल ऑमव्हेट यांनी जात प्रमुख म्हणून लिखाण केले. स्त्रीवादी लिखाणाला याच काळात मान्यता मिळाली. या विविध प्रवाह मधून १९८२ पासून वंचितांच्या अभ्यासात सुरुवात झाली.

**वंचितांचा इतिहास म्हणजे काय?**

इटलीतील मार्क्सवादी विचारवंत तत्वज्ञान ॲनामिओ ग्रॅमचीने वंचितांचा अभ्यास ही विचार प्रक्रिया प्रथम मांडली.Sabaltern म्हणजे कनिष्ठ दर्जाचे, कमी दर्जाचे दुय्यम ( वंचित) असा घटक असा त्याचा अर्थ आहे. Sabaltern ला मराठीत वंचित नावाने ओळखले जाते. आपल्या नैसर्गिक अधिकारापासून वंचित असलेले लोक किंवा त्यांचा समुदाय यांचा समावेश होतो. ग्रामचीने आपल्या प्रिझन नोट या ग्रंथात "दोन नोट्स ऑन इटालियन हिस्टरी"यामध्ये वंचितांच्या इतिहासाबद्दलची आपली कल्पना मांडली आहे. ग्रामची वंचितांचा इतिहास खालील मुद्द्यांच्या आधारे लिहावा असे सांगतो.

१. वंचित समाज गटाचा आर्थिक उत्पन्न प्रक्रियेतून उदय विकास आणि संक्रमण होते

२. सत्ताधीश राजकीय गटाशी त्यांचा असलेला सक्रिय निष्क्रिय संबंध त्यांच्या स्वतःच्या त्या कार्यक्रमाचे असलेला संबंध त्यावर त्यांनी वर्चस्व निर्माण करण्यासाठी केलेला प्रयत्न.

३. वंचित गटाने स्वतःचे अस्तित्व स्वीकारण्यासाठी केलेला प्रयत्न.

४. वंचितांनी एकात्मता व अंतर्गत स्वायत्तता मिळवण्यासाठी केलेला प्रयत्न.

भारतामध्ये वंचितांचा इतिहास लेखनास प्रा रणजीत गुहा, डॉक्टर शहीद अमीन, डॉक्टर सुमित सरकार यांनी चालना दिली

**सबाल्र्टन इतिहास लेखन**

वंचितांच्या इतिहास लेखन प्रवाहाचे उगमस्थान दक्षिण आशियाई राष्ट्रांच्या इतिहासाशी निगडित आहे. उदाहरणार्थ इंग्लंड या राष्ट्राने भारतावर सुमारे १९० वर्ष राज्य केले. तसेच पोर्तुगीज फ्रान्स या राष्ट्रांच्याही विविध राष्ट्रांमध्ये वसाहती होत्या. मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या शोषणाचा परिणाम म्हणून या वसाहतींनी परकीय राष्ट्राच्या विरोधात उठाव केले. या उठावात जनसामान्यांचा सहभाग लक्षणीय होता. मात्र परकीय शासनाच्या विरोधात केलेल्या उठावांची दखल त्या त्या काळातील इतिहास लेखकांनी घेतली नाही. वसाहतीतील जनसामान्यांनी प्रस्थापित राजवटीच्या विरोधात केलेल्या उठावाचे यथार्थ दर्शन इतिहास लेखनात आगुन आले नाही. अशा उठावातील समाजाच्या तळागाळातील जनसमुहांनी केलेली कामगिरी पूर्णतः माहिती करून घेतल्याखेरीज तात्कालीन इतिहासाचे सम्यक दर्शन होणार नाही. या धारणेतून त्याचा राष्ट्रातील विविध इतिहासकारांनी जे इतिहास लेखन केले त्याला सबाल्र्टन इतिहास लेखन असे म्हटले गेले.

**सबाल्र्टन अभ्यास विषय**

सबाल्र्टन अभ्यासामध्ये लोकवृत्तींच्या माध्यमातून इतिहासातील अनाभिज्ञ सध्याचा शोध घेतल्याचे दिसते. इतिहासात अनाभिज्ञ सत्य माहिती करून ते समजण्याचा प्रयत्न केलेला आहे. वंचितांचा अभ्यास करताना त्यांचे महत्त्वाचे कार्य घेण्यासाठी वाङमय लोककथा, लोकगीते आणि स्मृती यांचा आधार घेण्यात आला.

**१. कल्पित समुदाय**

बेनडिक्ट ऐंडरसन यांनी 'कल्पित समुदाय'अशी संज्ञा मांडलेली आहे.प्रसिद्ध सबाल्र्टन अभ्यासक रंजीत गुहा आणि पार्थ चॅटर्जी यांनी भारतातील राष्ट्रीय विचार धारेला काल्पनिक मानले आहे. यामध्ये अभिजनांनी वंचितांच्या विचारधारेला महत्त्व दिलेले नाही. पार्थ चॅटर्जी यांच्या मते, भारताचा एक अखंड इतिहास लिहिण्याऐवजी त्याचे खंड करून किंवा गटागटामध्ये विभाजन करून इतिहास लिहिला जावा.

**२. वंचितांचा इतिहास**

सबाल्र्टन अभ्यासामध्ये महत्त्वाचा भाग म्हणजे 'वंचितांचा इतिहास होय' वंचितांच्या इतिहासामध्ये त्यांच्या कार्याचा उल्लेख करून ते कार्य किती महत्त्वाचे आहे याची नोंद केली गेली. वंचितांच्या विकासाचा प्रगतीचा इतिहास लिहिणे हे राष्ट्राच्या विकासाचे प्रतीक आहे. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास लिहिताना तो सबाल्र्टन इतिहास या स्वरूपात लिहिला जावा

तसेच या इतिहासामध्ये अभिजन वर्गाचा दृष्टिकोन इतिहास लिहिला जावा.

**३. शेतकरी वर्गाचा इतिहास**

गोवा यांच्यामध्ये शेतकरी वर्गाचा इतिहास या अभ्यास विषयाचा करता स्वतः शेतकरी आहे. रणजीत गुहा आणि पार्थ चॅटर्जी यांनी शेतकऱ्यांच्या उठावाला 'शुद्ध चेतना' म्हटले आहे. शेतकरी वर्ग राष्ट्रीय चळवळीतील एक भाग होता. मात्र शुद्ध चेतना या संज्ञेने शेतकऱ्यांना व्यापक राष्ट्रीय चळवळीच्या मुख्य धारेतून वेगळे केले आहे. शेतकरी वर्गाचा इतिहास लिहिताना त्यांचा सखोल अभ्यास केला गेला. त्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणावरील शेतकऱ्यांचा उठा हा मुख्य विषय होता.

**४. स्वातंत्र्य सामुदायिक स्त्री अस्मिता**

स्त्री प्रश्नावर सबाल्टर्न इतिहासकारांचे एकमत असल्याचे दिसते त्यांच्या मते, राष्ट्रांमधील स्त्रियांना स्वातंत्र्य सामुदायिक अस्मिता असते. पार्थ चटर्जी यांच्या ' राष्ट्र आणि महिला' या लेखामध्ये असे मत व्यक्त करतात की, राष्ट्राच्या इतिहासांतर्गत स्त्रियांचा इतिहास लिहिणे हे स्त्रियांबरोबर अन्यायकारी आणि विश्वासघात केल्यासारखे होईल. म्हणून स स्त्रियांच्या योगदानाचा स्वतंत्र इतिहासात लिहिणे योग्य ठरते.

**५. आदिवासी उठाव**

आदिवासी उठाव हा सबाल्टर्न अभ्यासाचा महत्त्वाचा विषय आहे. आदिवासींचे उताव हे प्रामुख्याने जुलमी वसाहतीक शासनाविरुद्ध होते. परकीय वसाहतींनी केलेली आर्थिक पिळवणूक, जुनी शासकीय धोरणे यामुळे आदिवासींच्या परंपरागत जीवन पद्धतीवर आत्मस्मानावर आघात झाला परिणामी आदिवासी प्रतिकार करण्यास सिद्ध झाले.

**६. राष्ट्रीय आंदोलन**

राष्ट्रीय आंदोलनाच्या व्यापक प्रवाहात कामगार शेतकरी आदिवासी असे अनेक गट सामील झाले होते. राष्ट्रीय आंदोलनातील नेत्यांचे विचार व आदिवासींचे विचार भिन्न असल्याचे दिसते तसेच आदिवासींचे राष्ट्रीय आंदोलनातील सहभागामागील प्रेरणा ही भिन्न भिन्न होत्या. त्यामुळे राष्ट्रीय चळवळ एकजीनसी नव्हती अशी या गटाची भूमिका आहे. अशा पद्धतीने आदिवासी गटाला राष्ट्रीय चळवळीपासून वेगळी करून आदिवासींचा स्वातंत्र्य इतिहास लिहिणे योग्य ठरतो.

**७. स्वातंत्र्योत्तर इतिहास**

स्वातंत्र्य चळवळीतील विषयानंतर स्वातंत्र्योत्तर काळातील समस्यांचा अभ्यास महत्त्वाचा विषय आहे. भिन्न समाजातील सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक संकेतांचा त्यामागील सत्ता केंद्रांचा व भिन्न सत्ता केंद्रातील परस्पर संबंधांचा क्रिया - प्रतिक्रियांच्या इतिहास महत्त्वाचा आहे. स्वातंत्र्योत्तर इतिहासामध्ये वंचितांचे परिवर्तन घडून आलेत का? परिवर्तन घडले असेल तर त्या मागची कारणे कोणती? अशा महत्त्वाच्या मुद्द्यावर स्वातंत्र्योत्तर इतिहास लिहिणे योग्य ठरतो.

**सबाल्टर्न प्रवाहाची वैचारिक भूमिका**

सबाल्टर्न वैचारिक भूमिकेचे पैलू साकारमध्ये आणि नकारात्मक आहेत नाकारमक पैलू म्हणजे पारंपरिक इतिहास लेखन नाकारले जाणे आणि त्यानंतर इतिहास लेखनाचा नवीन प्रवास सुरू होणे याला सकारात्मक पैलू म्हणतात.

**१. नकारात्मक पैलू**

**१.अभिजन केंद्रित**

पारंपारिक इतिहास हा अभिजन वर्गाने लिहिलेला आहे. अभिजन वर्गाच्या वैचारिक भूमिकेतूनच लिहिला असल्यामुळे तो अभिजनवर्गासाठीच लिहिला आहे यामध्ये वंचितांचा बहुजनांचा समावेश नसल्यामुळे अभिजन वर्गाचे लेखन अभिजन वर केंद्रित झाले आहे.

**२. चळवळीचे नेतृत्व**

राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व अभिजन वर्गातील असलेले दिसून येते. त्यामुळे अभिजन वर्गातील इतिहासकाराने त्यांचेच कार्य अधोरेखित केलेले दिसते त्यामुळे चळवळीचे ध्येय अभिजान वर्गाला मिळाल्याचे आढळून येते.

**३. सामान्य श्रेया पासून वंचित**

कोणत्याही चळवळीत समुदाय गटाचा सहभाग महत्त्वाचा असतो. याशिवाय चळवळीचा विकास होत नाही. मात्र इतिहासकारांनी या गटाच्या सहभागाचे कार्य लिहिलेले नाही. त्यामुळे हे गट त्यांच्या भौतिक सहभागाच्या श्रेयापासून वंचित ठेवल्याचे दिसते.

**४. पाश्चात्य विचारांना महत्त्व**

पाश्चात्य शिक्षण आणि त्या शिक्षणातील राष्ट्रवादी लोकशाही या संकल्पनांमुळे चळवळीला प्रेरणा मिळाली आहे. त्यामुळे चळवळीचे श्रेय पाश्चात्य विचारवंतांना दिले जाते आणि सामान्याच्या उस्फुर्त पेरणीकडे दुर्लक्ष केलेले आढळते.

**२. सकारात्मक पैलू**

**१. अभिजन केंद्रस्थानी**

चळवळ आणि उठावातील नेतृत्व हे अभिजन वर्गाचे असते. चळवळ आणि उठावातील त्यांचे योगदान महत्त्वाचे असून ते उठावाचे खरे करते असतात म्हणून अभिजन केंद्रस्थानी ठेवून इतिहास लिहिला जातो.

**२. अभिजन प्रभाव**

समाज हा एक जिन्सी नसून तो आर्थिक धर्म जात लिंग प्रदेश अशा वेगवेगळ्या स्तरावर विभागलेला आहे. त्यामुळे समाजाच्या वरच्या स्तराची मानसिकता, विचार पद्धती, जीवन पद्धती ही वंचितांपासून वेगळी असते. बौद्धिक दृष्ट्या अभिजन स्वायत्त असतात त्यामुळे अभिजन वंचितांवर प्रभाव पाडतात.

**३. वंचितांचा विद्रोह**

अभिजन वर्ग वंचितांचा उपयोग त्यांच्या कार्यासाठी करतात आणि कार्य संपले की ते वंचितांकडे दुर्लक्ष करतात, अभिजन वंचिताच्या स्वातंत्र्य अस्तित्वाची इच्छा अपेक्षा चिंता करत नाहीत. तसेच अभिजन वंचितांच्या परंपरा आणि जीवन पद्धतीवर अतिक्रमण करतात. सत्ताधारी वर्गाच्या या अतिक्रमणाचा प्रतिकार करण्यास वंचित हळूहळू संघटित होतात आणि विद्रोह घडून येतो या विद्रोहाची प्रेरणा ते वंचित त्यांच्या पारंपारिक अनुभवातून घेतात.

**४. दुर्लक्षित अभ्यास विषय**

अभिजन वर्गाने वंचितांना त्यांच्या अधिकारापासून वंचित ठेवले आहे. वंचित समाज गटाच्या कार्याची नोंद ठेवलेली नाही. त्यामुळे वंचितांची प्रेरणा कोणती होती? त्यांचे गटातील संबंध कसे होते? त्यांच्या गटाची कृती कशी होती? आणि सत्ता केंद्राचा व त्यांच्या क्रिया प्रतिक्रियांचा अभ्यास हे सबाल्र्टन अभ्यासविषय दुर्लक्षित केलेले दिसते.

**वंचितांचा इतिहास आणि सामाजिक परिवर्तन**

वंचितांचा इतिहास म्हणजे समाजाने दुर्लक्षित केलेल्या सर्व हक्कापासून वंचित ठेवलेल्या लोकांचा इतिहास, या इतिहासाने सामाजिक बदलांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. या बदलांमध्ये महात्मा फुले आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी मोठे योगदान दिले आहे. या परिवर्तनामुळे सामाजिक समता, न्याय आणि हक्कासाठी संघर्ष केला गेला. ज्यांचे उदाहरण म्हणून भारतीय संविधानातील तरतुदी आणि वंचितांसाठी केलेल्या कायदेशीर उपाययोजना पाहता येतात.

**१. सामाजिक परिवर्तन**

**१. संविधानात्मक परिवर्तन**

भारतीय संविधानात समता स्वातंत्र्य बंधुता आणि न्याय या मुलांचा समावेश करण्यात आला. वंचितांना न्याय देण्यासाठी आणि त्यांचे हक्क संरक्षित करण्यासाठी अनेक कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या.

**२. समतेचा संघर्ष**

स्वातंत्र्यानंतर ही समाजात आर्थिक आणि सामाजिक विषमता कायम राहिली ही विषमता दूर करण्यासाठी आणि सर्वांना समान संधी मिळावी यासाठी कायदे व सुधारणांद्वारे प्रयत्न सुरू आहेत.

**३. जागतिक संदर्भ**

वंचितांच्या इतिहासाचा आणि सामाजिक परिवर्तनाचा विचार करताना जागतिक परिस्थिती आणि भारतीय वास्तवाचाही विचार करणे आवश्यक आहे. जागतिक स्तरावर ही अनेक विचारवंतांनी समाजातील दुर्बळ घटकांच्या हक्कासाठी आवाज उठवला आहे.

**सबाल्र्टन लेखनावरील आक्षेप**

सवालतं लेखनावर मोठ्या प्रमाणावर आक्षेप घेतले जातात ते पुढील प्रमाणे

**१. सबाल्र्टन लेखनाची समर्पकता**

सबाल्र्टन ही संकल्पना वंचितांसाठी समर्पक नाही. सबाल्र्टन ही संकल्पना दिशाभूल करणारी आहे कारण वंचितांचा विचार करताना शोषित व शोषक कोण आहेत? याला महत्त्व आहे एकाच गटात जर शोषित व शोषक असतील तर, सबाल्र्टन ही संकल्पना निरुपयोगी निरर्थक ठरते एक विशिष्ट गट आपल्यावरच्या स्तराकडून शोषित असतो तर स्वतःच्या हाताखालील लोकांचे तो शोषण करतो.

**२. आर्थिक शोषणाला गौण स्थान**

आर्थिक शोषण हा कोणत्याही उठावाचा क्रांतीचा परिवर्तनाचा महत्त्वाचा घटक आहे आर्थिक शोषणामुळे अनेक उद्रेक झालेले आढळतात मात्र सबाल्र्टनमध्ये आर्थिक शोषणाला गहू स्थान दिलेले दिसते. सबाल्र्टन त्यांच्या अभ्यासामध्ये मूलभूत आर्थिक शोषणाच्या विचारांकडे दुर्लक्ष करून केवळ जाणिवांचा विचार करण्यावर भर दिल्याचे आढळते.

**३. वंचित गट**

सबाल्टर्नमध्ये वंचित गटाचे स्पष्ट स्वरूप दिसत नाही, सबाल्टर्नचा पाया असलेल्या वंचित गटात अंतर्गत शोषक व शोषित असतात उदा. आदिवासींमध्ये शक्तिशाली व्यक्ती कमजोर व्यक्तींचे शोषण करतात. शेतकरी वर्गात मोठे शेतकरी लहान शेतकऱ्यांचे,शेतमजुरांचे शोषण करतात. म्हणून संपूर्ण आदिवासी आणि संपूर्ण शेतकरी वर्गाला वंचित गट म्हणता येणार नाही.

**४. नेतृत्व नाकारणे**

कोणत्याही उठावाला चळवळीला कुशल नेतृत्व महत्त्वाचे असते. सबाल्टर्न मध्ये वंचितांच्या उठावाच्या नेतृत्वाला महत्व न देता वंचितांच्या गटाला वेगळे केलेले आहे. कोणत्याही चळवळ, उठाव हे विचारवंत बुद्धिवंत अशा व्यक्तीच्या विचारांवर आधारित असते. त्यांच्या प्रेरणेमुळे चळवळ विकास पावते त्यामुळे अशा विचारवंतांना चवळी मधून वेगळे करून फक्त वंचितांच्या गटाचा अभ्यास करणे हे वास्तवाला धरून नाही.

**५. इतर गट दुर्लक्षित**

कोणत्याही चवळीचा उठावाचा संबंध विशिष्ट गटापुरता मर्यादित न राहता त्यात अनेक गट प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संबंधित असतात त्यामुळे वंचित गटाचा अभ्यास करताना व इतर संबंधित गटाचा अभ्यास करताना त्यांचा परस्पर संबंध दुर्लक्षित करता येणार नाही सबाल्टर्न मध्ये इतर गट दुर्लक्षित झालेले आढळते.

**निष्कर्ष:**

वंचितांचा इतिहास हा केवळ भूतकाळातील घटनांचा मेळ नसून, एक सतत चालू असलेला संघर्ष आहे. हा इतिहास आपल्याला समाजाच्या संपूर्ण चित्राकडे पाहण्यास शिकवतो. सत्ता, संसाधने आणि इतिहासलेखन कोणाच्या हातात आहे, याची जाणीव करून देतो. वंचितांच्या दृष्टिकोनातून इतिहासाचा अभ्यास केल्याशिवाय, तो पूर्ण आणि समतोल होऊ शकत नाही.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. इतिहासाची ओळख
प्रा. डॉ. भोसले जालिंदर, प्रा. सौ. भोसले सीमा, रघुनाथ पब्लिशिंग
२. मराठी वंचित साहित्य
डॉ .लवटे सुनील कुमार, अक्षर दालन प्रकाशन कोल्हापूर
३. नाशिक जिल्ह्यातील वंचितांचा परिवर्तनवादी इतिहास
प्रा . डॉक्टर रूपवते जी.डी, सनय प्रकाशन.